नि. फौ ख. क्र. १४६/ २०२४
नि १२

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ चा पुरावा

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,

माझे नावः– श्रध्दा योगेश कोतकर
वयः– २८ वर्षे
धंदाः– घरकाम
राः– सावेडी, अहमदनगर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. एल. वाडेकर यांचेमार्फत सुरुः–**

०१. आरोपी योगेश कोतकर हा माझा पती आहे. आकाश कोतकर हा माझा दिर आहे. माझे लग्न आरोपीशी दि.०९/०५/२०२३ रोजी आम्रपाली कार्यालय, सावेडी, अहमदनगर येथे झाले. लग्नानंतर मी नवी मुंबई उलवे येथे नांदणेस गेले. माझे पती, दिर आणि सासुसासरे असे आम्ही राहत होतो. मला शारिरीक आणि मानसिक त्रास देऊ लागले. दि. ०१/०८/२०२३ रोजी माझा भाऊ श्रीकांत मला नेण्याकरिता आला त्यावेळेस त्याने माझे शरिरावरील डाग बघितले व तो मला अहमदनगर येथे घेऊन आला. त्यावेळेस मी ७०८३७८२१८३ या क्रमांकाचा मोबाईल वापरत होते. माझा मोबाईल पतीने जाताना दिला नाही. माझे फेसबुकला waghaskar shraddha या नावाने अकांऊट होते तसेच इंस्टाग्रामला waghaskar.shraddha या नावाने अकांऊट होते. दि. १८/०८/२०२३ रोजी मी ७०८३७८२१८३ या क्रमांकाचे नविन सीमकार्ड घेतले. मी फेसबुक आणि इंस्टाग्राम चे अकांऊट ओपन करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा कोड ०५२० या क्रमांकावर जात होता. loc@gmail.com या ईमेल आयडी वर कोड जात होता. आमच्या लक्षात आले की, माझे अकांऊट अज्ञात इसमाने हॅक केले आहे. आम्ही सायबर पोलीस स्टेशनला अर्ज दिला की, माझे इंस्टाग्राम आणि फेसबुक अकांऊट ओपन होत नाही दुस–या इमेल आयडीवर कोड जातो. सायबर पोलीसांनी आम्हाला माहिती दिली की, अकांऊट व्हेरीफिकेशन कोड ९३२४९९०५२० या

क्रमांकाचा धारक वापरत आहे व सदरचा नंबर योगेश कोतकर यांचे नावे आहे. आम्ही फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **नि. १३** देण्यात आली. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. आता मला सायबर पोलीस स्टेशनला केलेला अर्ज दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **नि. १४** देण्यात आली. मी सायबर पोलीसांना इस्टाग्राम अकांऊटचे, कनर्फमेशन कोड, व्हेरिफिकेशन कोडचा स्क्रीन शॉट आणि अकांऊट रिकव्हरीचे स्क्रीन शॉट दिले होते. आता मला सदरचे स्क्रीन शॉट दाखविले ते तेच आहेत. त्यासोबत भारतीय पुरवा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र दिलेले आहे. आता मला प्रमाणपत्र दाखविले त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. १५** देण्यात आली. आता मला इस्टाग्राम अकांऊटचे प्रोफाईलचे स्क्रीन शॉट दाखविले. त्यास **नि. १६** देण्यात आली. आता मला गुगल अकांऊट रिकव्हरीचे स्क्रीन शॉट दाखविले. त्यास **नि. १७** देण्यात आली. आता कन्फरमेशन कोडचा स्क्रीन शॉट दाखविला. त्यास **नि. १८** देण्यात आली.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. डी. गांधी यांचेमार्फत सुरुः</u>–**

२. डिसेंबर २०२२ पासुन मी आरोपीला ओळखते. सप्टेंबर २०२२ पासुन माझ्या आणि आरोपींच्या कुटूंबामध्ये लग्न जुळण्याबाबत चर्चा सुरु होती. हे म्हणणे खरे नाही की, सप्टेंबर २०२२ च्या एक ते दिड महिन्यानंतर माझे आणि आरोपीचे बोलणे सुरु झाले. जानेवारी २०२३ मध्ये आमच्याकडुन होकार देण्यात आला. सप्टेंबर २०२२ मध्ये आरोपीच्या कुटूंबाबाबत आम्ही चौकशी केली. आरोपी उच्च शिक्षीत आणि मोठया कंपनीत नोकरीस आहे व त्याचा पगार आकर्षक आहे अशी माहिती आम्हाला मिळाली. दि. ११/०२/२०२३ रोजी माझा आरोपीशी साखरपुडा झाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि त्याचे कुटूंबियांनी जामीनाचा अर्ज केला होता त्याची नोटिस मला मिळाली व जामीन अर्जास मी विरोध केला होता. सप्टेंबर २०२३ मध्ये मला नोटिस मिळाली. हे

म्हणणे खरे आहे की, सदरची नोटिस मिळाल्यानंतर मी सायबर पोलीस स्टेशनला अर्ज केला. नि. १४ चा अर्ज मी स्वतः माझ्या हस्ताक्षरात लिहिला असुन तो मी सादर केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. १४ च्या अर्जामध्ये मी नमुद केले नव्हते की माझा मोबाईल आरोपीकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. १४ च्या अर्जामध्ये माझा मोबाईल कुठेतरी गहाळ झाला असे नमुद केले आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापूर्वी मी क्यु कनेक्ट या कंपनीमध्ये नोकरीस होते. सदरची कंपनी आय टी कंपनी होती किंवा नाही याबाबत मला सांगता येत नाही. माझे शिक्षण बी.एसस्सी झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेसबुकच्या युजरनेम मध्ये स्पेस नसते. तो केस सेनसेटीव्ह असते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादमध्ये नमुद केलेल्या waghaskar shraddha या युजरनेम मध्ये स्पेस आहे. हे म्हणणे खरे नाही की, loc@gmail.com हा ईमेल आयडी आरोपीचा नाही. इंस्टाग्राम अकांऊट मी सन २०१७ मध्ये सुरु केले. हे म्हणणे खरे आहे की, माझे स्नॅप चॅट चे अकांऊट shraddharak या नावाने होते. दि. २२/०९/२०२३ रोजी माझ्या भावाचे आणि आरोपीचे फोन कॉलद्वारे वाद झाले होते याबाबत मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाने मला सांगितले की सायबर क्राईममध्ये तक्रार दे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये मोबाईलेच मॉडेल व कंपनी नमुद केलेले नाही. मोबाईल आरोपीच्या ताब्यात असुन तो मिळण्याकरिता मी अर्ज केला होता किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोबाईल आरोपीच्या ताब्यात नसुन तो माझ्या ताब्यात होता. हे म्हणणे खरे नाही की, नि. १५ ला दाखल केलेले प्रमाणपत्र अपूर्ण आणि चुकीचे आहे. प्रमाणपत्रामध्ये काय काय लिहिणे अपेक्षित आहे याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी ज्याप्रमाणे प्रमाणपत्र तयार केले त्याप्रमाणे मी दिले. हे म्हणणे खरे आहे की, प्रमाणपत्र पोलीसांनी तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, ९३२४९९०५२० हा मोबाईल आरोपी वापरत होता याची मला वैयक्तीक माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, आरोपी ९३२४९९०५२० क्रमांकाचा मोबाईल वापरत होते याची मला माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी विरुध्द भा. द. वि. कलम ३७६, भा.द.वि. कलम ४९८– अ, कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षा कायदा, घटस्फोट याप्रमाणे प्रकरणे दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीसोबत नांदण्याची नियत नव्हती. मेलव्हीन अरुणदास हा आमच्या कंपनीमध्ये नोकरीस होता त्यामुळे माझा परिचय आहे. माझ्या अकांउटवरुन मेलव्हीनच्या स्नॅप चॅट अकांऊटवर दि. फेब्रुवारी २०२३ ते ऑगस्ट २०२३ च्या दरम्यान जे चॅट झाले ते मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आणि मेलव्हीनची फोन पे वरुन पैशाची देवाण घेवाण होत होती. हे म्हणणे खरे नाही की, मेलव्हीनशी मी रिलेशन शिपमध्ये होते.

प्रश्नः– मेलव्हीनशी केलेली स्नॅप चॅट कधी दाखल करु शकता ?

उत्तरः– सध्या माझ्याकडे मोबाईल नसल्यामुळे आणि माझा फोन बंद असल्यामुळे मी स्नॅप चॅट अकांऊटचे चॅट दाखल करु शकत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी ७०८३७८२१८३ या माझ्या जुना मोबाईल क्रमांकाचे नविन सिम घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या स्नॅप चॅट अकांऊटला सदरचा क्रमांक होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा सदरचा मोबाईल क्रमांक अस्तिवात असल्यामुळे स्नॅप चॅट चर हिस्ट्री मी रिव्हकर करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि मेलव्हीनचे संबंध उघडकीस येतील म्हणुन मी चॅट दाखल करण्यास तयार नाही.

मध्यांतर झाल्यामुळे उलटतपास थोडया वेळा करिता तहकुब करण्यात आला.

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृती

(राजेंद्र शा. रोटे)
मुख्यन्यायदंडाधिकारी
अहमदनगर

दि. १९/०४/२०२५
अहमदनगर

**<u>मध्यांतरानंतर शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. डी. गांधी यांचेमार्फत पुन्हा सुरु</u>–**

६. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती, दिर आणि सासुसासरे असे आम्ही राहत होतो, मला शारिरीक आणि मानसिक त्रास देऊ लागले, दि. ०१/०८/२०२३ रोजी माझा भाऊ श्रीकांत मला

नेण्याकरिता आला त्यावेळेस त्याने माझे शरिरावरील डाग बघितले व तो मला अहमदनगर येथे घेऊन आला, त्यावेळेस मी ७०८३७८२१८३ या क्रमांकाचा मोबाईल वापरत होते, माझा मोबाईल पतीने जाताना दिला नाही, माझे फेसबुकला waghaskar shraddha या नावाने अकांऊट होते तसेच इंस्टाग्रामला waghaskar.shraddha या नावाने अकांऊट होते, दि. १८/०८/२०२३ रोजी मी ७०८३७८२१८३ या क्रमांकाचे नविन सीमकार्ड घेतले, मी फेसबुक आणि इंस्टाग्रामचे अकांऊट ओपन करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा कोड ०५२० या क्रमांकावर जात होता, loc@gmail.com या ईमेल आयडी वर कोड जात होता. आमच्या लक्षात आले की, माझे अकांऊट अज्ञात इसमाने हॅक केले आहे, आम्ही सायबर पोलीस स्टेशनला अर्ज दिला की, माझे इंस्टाग्राम आणि फेसबुक अकांऊट ओपन होत नाही दुस–या इमेल आयडीवर कोड जातो. सायबर पोलीसांनी आम्हाला माहिती दिली की, अकांऊट व्हेरीफिकेशन कोड ९३२४९९०५२० या क्रमांकाचा धारक वापरत आहे व सदरचा नंबर योगेश कोतकर यांचे नावे आहे, आम्ही फिर्याद दिली, मी सायबर पोलीसांना इस्टाग्राम अकांऊटचे, कनर्फमेशन कोड, व्हेरिफिकेशन कोड चा स्क्रीन शॉट आणि अकांऊट रिकव्हरीचे स्क्रीन शॉट दिले होते, आता मला सदरचे स्क्रीन शॉट दाखविले ते तेच आहेत, त्यासोबत भारतीय पुरवा कायदा कलम ६५ –ब प्रमाणपत्र दिलेले आहे, माझे सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे.

७. दि. ०१/०८/२०२३ च्या घटनेबाबत मी ॲड हरिष टेमकर यांचे मार्फत नोटिस पाठविली होती याबाबत मला सांगता येत नाही. आता मला फेरिस्त नि. १९ ला दाखल केलेली नोटिस दाखविली. त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१/०८/२०२३ रोजी माझा भाऊ मला नेण्याकरिता आला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/०८/२०२३ रोजी मला नेण्याकरिता आई वडिल आले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, आई वडिल आणि भाऊ आले होते. मी फिर्याद देतेवेळी मला नेण्याकरिता आई वडिल आणि भाऊ आले होते असे

सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, नोटिसमधील आरोपीविरुध्द केलेले कथने खोटे आहेत. मी फिर्याद देतेवेळी सांगितले होते की, श्रीकांत मला नेण्याकरिता आला त्याने माझे अंगावरील डाग बघितले. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मजकुर फिर्यादमध्ये नमुद नाही. मी पोलीसांसमोर फिर्याद देतेवेळी सांगितले होते की, माझे इंस्टाग्राम आणि फेसबुक अकांऊट ओपन होत नाही दुस–या इमेल आयडीवर कोड जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मजकुर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. नि. १६ ते १८ चे स्क्रीन शॉट कोणत्या तारखेला, कोणत्या मोबाईलवरुन काढले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आय पी ॲड्रेस युनिक असतो तो बदलत नाही. प्रत्येक डिव्हाईसला MAC ॲड्रेस असतो याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ९३२४९९०५२० या मोबाईल क्रमांकाचे धारक किंवा मालक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी किंवा कुटूंबियांनी सदर क्रमांकाचा मोबाईल वापरला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर क्रमांकाचा मोबाईल माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्ष देण्याबाबत आज रोजी चर्चा करण्यात आली. आरोपींनी आमच्या विरुध्द सागरी पोलीस स्टेशन मुंबई येथे दि. २२/०९/२०२३ तक्रार केली याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्या विरुध्द तक्रार केल्यामुळे त्यास विरोध म्हणुन प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृती

RAJENDRA SHANTINATH ROTE
Digitally signed by RAJENDRA SHANTINATH ROTE
DN: cn=RAJENDRA SHANTINATH ROTE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6951313, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.04.19 18:13:48 +0530

(राजेंद्र शा. रोटे)

दि. १९/०४/२०२५ मुख्यन्यायदंडाधिकारी

अहमदनगर अहमदनगर